खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर

## अर्थशास्त्र विभाग

### शैक्षणिक वर्ष 2023 – 2024 मधील उपक्रम अहवाल

शैक्षणिक वर्ष 2023 – 2024 मधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. त्या सर्व उपक्रमाचा संक्षिप्त अहवाल खालील प्रमाणे देत आहोत.

शुक्रवार दि.1 सप्टेंबर 2023 रोजी द्वितीय वर्ष अर्थशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ आयोजित करण्यात आले याप्रसंगी टी. वाय. बी. ए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षात अर्थशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबचे पुष्प देऊन केले. शैक्षणिक वर्षामध्ये अर्थशास्त्र विभाग अंतर्गत विविध तज्ञांचे व्याख्यान आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये मा. डॉ. सुनील उगले अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) यांचे "अर्थशास्त्र विषयाच्या संधी" प्रा. सुभाष रणशूर एस.एन.डी.टी विद्यापीठ पुणे. यांचे “संशोधन लेख आणि संशोधन प्रकल्प” या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. एम. ए. अर्थशास्त्र आणि टी. वाय. बी. ए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील अध्ययवत माहिती प्रात्यक्षिक स्वरूपात मिळावी या हेतूसाठी राजगुरुनगर सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयास भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे अर्थशास्त्र विभागामध्ये Economic Forum ची स्थापना गेल्या अनेक वर्षापासून झालेली आहे. त्यात प्रत्येक महिन्याच्या शनिवारी विद्यार्थ्यांना विविध संकलित केलेल्या माहितीचे सादरीकरण करण्याची संधी दिली जाते. याप्रसंगी विद्यार्थी अर्थव्यवस्थेतील चालू घडामोडींचा मागोवा घेतात.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठावरून आपले विचार मांडण्याची संधी मिळते. द्वितीय सत्रामध्ये अर्थशास्त्र विभागाच्या वतीने “सर्टिफिकेट कोर्स इन ऍडव्हान्स बँकिंग अँड फायनान्स” या शॉर्ट टर्म कोर्स चे उद्घाटन शनिवार दिनांक 24/02/2024 रोजी मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. सदर उद्घाटन प्रसंगी उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. आर. एस. शिरसी, प्रा.डॉ. बी. ए. वायकर, प्रा. एस. व्ही. धानापुने, प्रा. वर्षा वाळुंज उपस्थित होते. शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत प्रा. डॉ.

आर. एस. शिरसी, प्रा. डॉ. विकास रासकर प्रा.डॉ. बी. ए.वायकर. प्रा. जयश्री आरुडे प्रा. योगिता पटांगणे, प्रा. वर्षा वाळुंज यांचे व्याख्यान झाले.याचबरोबर तज्ञ व्याख्यान मध्ये विलास पोतले शाखाप्रमुख, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, राजगुरुनगर यांचे "मॉडर्न टेक्नॉलॉजी इन बँकिंग सेक्टर" प्राजक्ता मांजरे (राजगुरुनगर सहकारी बँक) श्री. सोपान नाणेकर मॅनेजर एचडीएफसी यांचे "ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी इन बँकिंग" या विषयावर व्याख्यान झाले. शॉर्ट टर्म कोर्स अंतर्गत दिनांक 12/ 3/ 2024 रोजी सेंट्रल बँक ऑफ इंडिया राजगुरुनगर या शाखेला अभ्यास भेट देण्यात आली.

विविध उपक्रमांबरोबरच जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून काव्यवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत एस. वाय व टी.वाय.बी.ए मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.त्यातील कविता वाचन,विषय व सादरीकरण विचारात घेऊन तीन क्रमांक काढण्यात आले. सदर स्पर्धेच्या निमित्ताने अर्थशास्त्र विभागातील कार्यरत असणा-या महिला प्राध्यापक प्रा. एस. व्ही. धानापुणे,प्रा. वर्षा वाळुंज यांचा सत्कार करून बक्षीस वितरण करण्यात आले. अर्थशास्र व राज्यशास्र विभागाची शैक्षणिक सहलीचे आयोजन डॉ. कैलास सोनावणे. डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. रोहोणी पाटोले व डॉ भूषण वायकर यांनी केले.लोणावळा- महड - पाली - उन्हेरे – काशीद बीच इ. ठिकाणी शैक्षणिक सहल गेली होती. सदर सहलीमध्ये एस. वाय / टी वाय बीए अर्थशास्त्र व राज्यशास्त्र विद्यार्थी सहभागी झाले होते. कोकणात सदाहरित व निम सदाहरित आरण्ये आढळतात. यात नारळ, पोफळी, सुपारी, बिब्बा, निरगुडी इ. वनस्पतींचा समावेश होतो. नारळ हा कोकणचा कल्पवृक्ष आहे. कोकणात अनेक औषधी वनस्पती महत्त्वाच्या आहेत याचा अभ्यास विद्यार्थांनी केला. मार्च महिन्यात टी वाय बी ए आणि एम ए द्वितीय वर्ष या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या सदिच्छा समारंभ आणि अर्थशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आलेल्या सर्टिफिकेट कोर्स इन ऍडव्हान्सड बँकिंग एन फायनान्स या शॉर्ट टर्म कोर्स समारोप व प्रमाणपत्र वितरण या कार्यक्रमात मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले.या कार्यक्रम प्रसंगी अर्थशास्त्र विभागाचा माजी विद्यार्थी निखिल भोगाडे या विद्यार्थ्यांची सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून नेमणूक झाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. शिरीष पिंगळे सरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि ग्रंथ भेट देऊन विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे सरांनी अर्थशास्त्र विभागातील कार्यरत असणाऱ्या सर्व प्राध्यापकांचे आणि सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे हे देखील उपस्थित होते त्याचबरोबर अर्थशास्त्र विभागात कार्यरत असणारे प्रा. एस. व्ही. धानापुने, डॉ. बी. ए. वायकर,प्रा. व्ही. एस. वाळुंज उपस्थित होते. सदर कोर्स यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, महाविद्यालयाचे प्रबंधक या सर्वांचे मार्गदर्शन लाभले. तसेच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्रजी बुट्टे पाटील, उपाध्यक्ष माननीय श्री नानासाहेब

टाकळकर, मानद सचिव हरिभाऊशेठ सांडभोर आणि सर्व संस्थेचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनामुळे शॉर्ट टर्म कोर्स यशस्वी संपन्न झाला.














HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

विभाग प्रमुख
अर्थशास्त्र
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, जि.पुणे

**विभाग प्रमुख**

**प्रो.डॉ.आर.एस.शिरसी**